लोकसत्ता
Mubai Date 7.11.2014 Page 10

# 'एक्सेल गॅस'चे ५०० कोटींच्या उलाढालीचे उद्दिष्ट

## भांडवली बाजारातून निधी उभारणी व सूचिबद्धतेचा प्रस्ताव

व्यापार प्रतिनिधी, मुंबई

औषधनिर्माण तसेच तेल व वायू कंपन्यांना लागणाऱ्या पाइप जोडणी उभारणीतील एक्सेल गॅस ॲण्ड इक्विपमेन्ट्सने आगामी दशकभरासाठी विस्ताराचा प्रवास आखला असून याअंतर्गत ५०० कोटी रुपयांच्या उलाढालीचे उद्दिष्ट राखले आहे. या दरम्यान कंपनी भांडवली बाजारात सूचिबद्ध होण्याची तयारीदेखील दर्शवित असून नव्या प्रकल्पांसाठी १०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार आहे.

फायझर, सिप्लासारख्या औषधनिर्माण तसेच रिलायन्स, कतार पेट्रोलियमसारख्या तेल व वायू क्षेत्रातील कंपन्यांना लागणाऱ्या अंतर्गत पाइप जुळवणी क्षेत्रात देशातील पहिल्या पाच कंपन्यांमध्ये एक्सेल कंपनीचा समावेश आहे. कंपनीने येत्या चार वर्षांत देशभरातील पाच शहरांमध्ये २० वायू प्रकल्प उभारण्याचे निश्चित केले असून त्यासाठी १०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील अकोलेचे शेतकरी राहिलेल्या ४२ वर्षीय नितीन गोडसे यांनी १९९९ मध्ये या कंपनीची स्थापना केली. कंपनीत सध्या १५०हून अधिक मनुष्यबळ असून सद्य उलाढाल २५० कोटी रुपये आहे. ही संख्या २०२२ पर्यंत अनुक्रमे ५,००० व ५०० कोटी रुपये ही होईल, असा विश्वास गोडसे यांनी 'लोकसत्ता'जवळ व्यक्त केला.

कंपनीने आगामी दशकभरासाठीची विस्तार योजना हाती घेतली असून याअंतर्गत कंपनी या क्षेत्रासाठी आवश्यक असलेले तांत्रिक शिक्षण, तेल उत्पादन आदी क्षेत्रांतही शिरकाव करणार असल्याची माहिती कंपनीचे संचालक गोडसे यांनी दिली. उद्योगांमध्ये लागणाऱ्या विविध कारणांसाठीच्या तेल उत्पादनाकरिता ठाण्यातील भिवंडीनजीक ५० कोटी रुपयांची गुंतवणूक असलेला प्रकल्प साकारण्याची मनीषाही त्यांनी व्यक्त केली.

२०१८ पर्यंत कंपनी भांडवली बाजारात सूचिबद्ध करण्याचा विचार बोलून दाखवितानाच गोडसे यांनी याच दरम्यान गुजरातेत वार्षिक २,००० टननिर्मिती क्षमतेचा व २५ कोटी रुपये गुंतवणुकीचा सिमलेस ट्युबनिर्मिती प्रकल्प उभारण्यात येणार असल्याचेही सांगितले. दोन ते तीन एकर जागेवरील या प्रकल्पाबाबत लवकरच जागानिश्चिती होऊन तो पूर्णत्वाने कार्यान्वित होईल, असेही ते म्हणाले.